फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

# << परिपत्रक >>

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयातील वाणिज्य विद्याशाखांतर्गत बी.कॉम तृतीय वर्ष या विषयाचा पाचव्या व सहाव्या सत्राकरिता खालील परिक्षा पद्धती शैक्षणिक वर्ष २०१३—१४ पासून लागू करण्यात आलेली आहे.

प्रत्येक विषयास ५० गुण राहतील त्यापैकी ४० गुणाची परिक्षा विद्यापीठ घेईल. त्यापरिक्षेत पहिला प्रश्न अनिवार्य राहिल व दुसरा,तिसरा व चौथा प्रश्नास प्रत्येकाला एक प्रश्न किंवा (OR) राहिल या चार प्रश्नास प्रत्येकी १० गुण राहतील अशी विद्यापीठाची परिक्षा पध्दत राहिल.

महाविद्यालयात प्रत्येक विषयाला १० गुणाच्या दोन परिक्षा दिर्घ प्रश्नाच्या राहतील त्याची यादी विद्यापीठाला परिक्षेपुर्वी दाखल करणे अनिवार्य राहिल. व उत्तर पत्रिका महाविद्यालयात पुढील परिक्षेपर्यंत सुरक्षित ठेवण्यात येतील.

बी.कॉम. तृतीय वर्ष पाचव्या व सहाव्या सत्राकरिता विशेष विषय गट दिलेले आहेत. त्या प्रत्येक विशेष विषय गटात तीसरा पेपर प्रशिक्षण व प्रकल्प अहवाल ( Project Report) असा ठेवण्यात आलेला आहे. त्यापैकी पाचव्या सत्रात त्या विशेष विषयाचे एक महिण्याचे प्रशिक्षण महाविद्यालयाच्या तासिका व्यतीरिक्त वेळेत प्रशिक्षण पुर्ण करावे त्याकरिता प्रशिक्षणा करिता रुजू झाल्याचे व पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र ज्या ठिकाणी प्रशिक्षण पुर्ण केले त्यांच्याकडुन घेण्यात यावे. त्याआधारे वाणिज्य विभागाच्या संबंधित प्राध्यापकाने ५० पैकी गुणदान करून गुण यादी तयार करावी.

सत्र सहावे करिता प्रशिक्षणाचा प्रकल्प अहवाल विद्यार्थ्यांकडुन तयार करुन घ्यावा व त्या अहवालाकरिता ५० गुण राहतील त्यापैकी २० अंतर्गत गुण राहतील व राहिलेले ३० गुण बहिर्गत परिक्षकाकडुन मौखिक परिक्षा घेऊन देण्यात येतील अशी ५० गुणाची परिक्षा घ्यावी असे एकुण १०० गुणांची एकत्रित गुणयादी ६ व्या सत्रा बरोबरच्या अंतर्गत गुणासोबतच सादर करावी. पाचव्या सत्रासाठी यादी पाठवु नये.

तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

''ज्ञानतीर्थ'' परिसर )(
विष्णुपूरी, नांदेड. )( sd-
जा.क्र.शैक्षणिक/०१/अभ्यासक्रम/२०१३—२०१४/१२१३ )( संचालक
दिनांक : २८/०९/२०१३ )( महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :</u>
१) मा. परीक्षा नियंत्रक, यांचे कार्यालय प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. प्राचार्य, संलग्नीत वाणिज्य महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ,
३)सिस्टम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ. (सदरील परिपत्रक व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता.)